# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

'सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ'

## महाविद्यालय विकास विभाग

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपूर–४४० ००१, दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२५२९९३२,२५२२३१०
फॅक्स नं. ०७१२–२५५५७०१, Email ID : infoarcollege@ymail.com


क्र. म.वि. वि/5072 दिनांक:–13/8/२०१९.

## प रि प त्र क

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधित विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाचे विभाग प्रमुख, विद्यापीठ संचालित व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता प्रवेशासाठी इच्छुक संबंधीत विद्यार्थ्यांना कळविण्यात येत आहे की, सत्र २०१९–२० या शैक्षणिक सत्राकरिता विद्यापीठाव्दारे सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाईन केंद्रीय पध्दतीने एकूण तीन टप्यांमध्ये राबविण्यात आली आहे.

ऑनलाईन केन्द्रीय प्रवेश पध्दतीच्या प्रक्रियेमध्ये प्रत्येक अभ्यासक्रमांसाठी प्रवेशाच्या दोन फेरी ऑनलाईन पध्दतीने करण्यात आल्या. त्यानंतर उर्वरित रिक्त प्रवेशांच्या जागांवर तिसऱ्या फेरीमध्ये विद्यापीठाने जाहिर केलेल्या गुणवत्ता यादी मधील विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या गुरुनानक भवन, नागपूर येथे संपन्न झालेल्या स्पॉट कॉन्युसिलिंग फेरीद्वारे प्रवेश देण्यात आलेले आहे. वरील सर्व प्रकिया पुर्ण झाल्यानंतर देखील महाविद्यालयात प्रवेश रिक्त असतील अशा महाविद्यालयांनी इच्छिुक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे दृष्टिने आपल्या स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

वरीलप्रमाणे महाविद्यालयीन स्तरावर होणा–या प्रवेशाकरिता महाविद्यालयांच्या Log-in-ID मध्ये "College Level Admission" म्हणून Link देण्यात आलेली आहे हया Link मध्ये प्रत्येक प्रवेशित विद्यार्थ्यांना अर्ज भरुन पात्र विद्यार्थ्यांचे प्रवेश विद्यापीठाने ठरविलेल्या प्रवेशाच्या शेवटच्या तारखेपर्यंत गुणवत्तेनुसार (Inter-se-Merit) करावेत.

विभागात/महाविद्यालयांमध्ये झालेला प्रत्येक प्रवेश हा महाविद्यालयाच्या Log-in-ID मध्ये Upload करण्यात यावा व झालेल्या सर्व प्रवेशाची यादी तीन प्रतीमध्ये प्रवेशाच्या अंतीम तारखेनंतर त्वरित विद्यापीठास सादर करण्यात यावी.

मा. प्रकुलगुरु तथा सक्षम
अधिका–यांचे आदेशान्वये

(डॉ. रमण मदने)
उपकुलसचिव (म.वि.वि.)
(अति.कार्य),

JNaw/kaw/Circular